स्क्रीन रिडरचा बादशहा

सांज दैनिक बीड
RNI : Regd.No.MAH/MAR/2010/43846

# वास्तव

सच करीब से ही दिखता है...!

भारतरत्न रतनजी टाटा यांच्या महान देशभक्तीला समर्पित

वास्तवी २१ वर्षे

एडिटर इन चिफ- जितेंद्र सिरसाट

● बीड ● शनिवार, दिनांक २५ जुलै २०२६ ● वर्ष २१वे ● पाने : ४ http://epaper.beedvastav.com Email : beedvatsav@gmail.com ● किंमत ३ रुपये

# धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा !

# कॉकरोच पुढे मोदी सरकार झुकले, वाकले अन् आता झोपायची पण तयारी !!

- "कॉक्रोचशी पंगा घेऊनका", धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर अभिजीत दिपके यांची पहिली प्रतिक्रिया आली समोर
- 12 वर्षांपासून अहंकाराच्या धुंदीत असलेल्या सरकारला झुकवण्यात अखेर विद्यार्थ्यांना यश - आमदार रोहित पवार यांची प्रतिक्रिया
- शांततापूर्ण आंदोलक, विद्यार्थी आणि विरोधी पक्षांच्या सातत्यपूर्ण दबावानंतर प्रधान यांचा राजीनामा; मी आंदोलकाचे अभिनंदन करते : सुप्रिया सुळे

## शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधानांचा राजीनामा होताच मुख्यमंत्री फडणवीस तातडीने दिल्लीला रवाना




**दिल्ली : वृत्तसंस्था**

**गेल्या 36 दिवसांपासून दिल्लीत जंतर मंतरवर शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करत आंदोलन करणाऱ्या कॉक्रोच जनता पार्टीच्या मागणीला यश आले असून, धर्मेंद्र प्रधान शिक्षणमंत्रीपदावरुन पायउतार झाले आहेत. धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिल्यानंतर कॉक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपकेंनी पहिली प्रतिक्रिया दिली आहे. ''आपण करुन दाखवलं'', असे म्हणत दिपके आणि आंदोलकांनी जंतर मंतरवर जल्लोष केला. ''धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिला आहे. हे काय म्हणत होते की, या सरकारमध्ये राजीनामे होत नाहीत'', अशी प्रतिक्रिया दिपकेंनी दिली.**

### अभिजीत दिपके काय म्हणाले?

"घाबरायचं नाही, लोकशाही आहे, लोकशाहीत बोलायला भीती वाटत असेल तर कसली लोकशाही? आवाज उठवला तरच हे लोक लाईनमध्ये राहतील, आणि यांना लाईनमध्ये ठेवणे आवश्यक आहे. वरती बादशाह समजून बसलेले लोक, आमच्यामुळे तिथे बसलेत. राजीनामा तर झालाय पण, आम्ही असे जाणार नाही, आमच्या आणखी दोन मागण्या आहेत", असे अभिजीत दिपके प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर आंदोलकांशी बोलताना म्हणाले.

### दिपके यांनी आणखी दोन मागण्या मांडल्या

"नीट परीक्षेतील गैरप्रकारामुळे आत्महत्या केलेल्या मुलांच्या कुटुंबीयांना एक करोड रुपये नुकसान भरपाई मिळावी आणि २० तारखेला आंदोलकांवर लाठीमार करणाऱ्या पोलिसांवर कारवाई करण्यात यावी", अशा दोन मागण्या असल्याचे दिपके यावेळी आंदोलकांशी बोलताना म्हणाले. "आता केवळ एकच राजीनामा घेतला आहे. तर तुम्ही कोण आहात", असे म्हणत दिपकेंनी दिल्लीतील काही पोलिस अधिकाऱ्यांची नावे घेतली.



### आंदोलनाचे लोण पसरत असतानाच 47 अधिकाऱ्यांवर बडतर्फीची कारवाई

- गेल्या काही दिवसांपासून नीट परीक्षा पेपरफुटीचं प्रकरण देशभरात चर्चेत आहे. या नीट पेपरफुटी प्रकरणावरून दिल्लीत एका महिन्यापासून कॉक्रोच जनता पार्टीचं आंदोलन सुरू आहे.
- पेपर फुटीप्रकरणी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासाठी देशभर आंदोलनाचे लोण पसरत असतानाच राष्ट्रीय परीक्षा संस्थेने (एनटीए) शुक्रवारी मोठी कारवाई करत ४७ अधिकाऱ्यांवर बडतर्फीची कारवाई केली.
- काही अधिकाऱ्यांवर कायदेशीर व फौजदारी कारवाई करण्यासाठी पावले उचलण्यात येणार असल्याचे 'एनटीए'कडून सांगण्यात आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत पेपरफुटीविरोधातील नव्या विधेयकाच्या मसुद्याला मंजुरी देण्यात आली आहे.
- या विधेयकात पेपर फोडल्यास १० वर्षांची शिक्षा, १० कोटींचा दंडाची तरतूद आहे.

---

**न्यायालयाच्या महत्त्वपूर्ण निकालाने आनंदोत्सव** ➤ अण्णासाहेब जाधव यांचे मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन

# स्मारक उभारणी प्रकरणात बाळराजे आवारे पाटील यांना जामीन मंजूर

➤ प्रत्यक्ष, अप्रत्यक्षपणे सहकार्य करणारे सर्व शिवप्रेमी, हितचिंतक, कायदेशीर मदत करणारे व नैतिक पाठिंबा देणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे मनःपूर्वक आभार : आवारे पाटील

**अंजनगाव (ता. माढा) : प्रतिनिधी**

अंजनगाव (ता. माढा, जि. सोलापूर) येथे छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभारण्याच्या पार्श्वभूमीवर घडलेल्या प्रकरणात आरोपी असलेले स्मारक योद्धा बाळराजे आवारे पाटील यांना भारतीय दंड संहितेच्या (IPC) कलम 307 सह दाखल गुन्ह्यात माननीय न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. न्यायालयाच्या या आदेशानंतर त्यांच्या समर्थकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. सत्य परेशान हो सकता है लेकीन पराजित नही, अशी भावना बाळराजे आवारे पाटील यांचे निकटवर्तीय अण्णासाहेब जाधव यांनी व्यक्त केली आहे.

**राज्यभरातील शिवप्रेमी व विविध सामाजिक संघटनांचे लक्ष वेधले होते!!**


न्यायालयाने उपलब्ध कागदपत्रे, तपासाची स्थिती आणि दोन्ही बाजूंचा युक्तिवाद विचारात घेत जामीन मंजूर केल्याची माहिती समोर आली आहे. जामीन मंजूर होणे म्हणजे संबंधित व्यक्ती निर्दोष ठरल्याचा निर्णय नसून, या प्रकरणाचा अंतिम निकाल न्यायालयीन सुनावणीनंतरच लागणार आहे. जामीन मंजूर झाल्यानंतर बाळराजे आवारे पाटील यांनी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे सहकार्य करणारे सर्व शिवप्रेमी, हितचिंतक, कायदेशीर मदत करणारे व नैतिक पाठिंबा देणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे मन:पूर्वक आभार व्यक्त केले. "आपल्या सर्वांच्या सहकार्यामुळे हा लढा अधिक बळकट झाला असून भविष्यातही असेच प्रेम, विश्वास आणि साथ लाभत राहो," अशी भावना त्यांनी व्यक्त केली. या प्रकरणाकडे राज्यभरातील शिवप्रेमी आणि विविध सामाजिक संघटनांचे लक्ष लागले असून पुढील न्यायालयीन प्रक्रियेकडे सर्वांचे लक्ष केंद्रित झाले आहे.

### प्रसाद ढिकलेंचे निस्वार्थी भावनेणे सहकार्य!

या प्रकरणात ॲड. प्रसाद ढिकले यांनी निस्वार्थी भावनेने न्यायालयात प्रभावी युक्तिवाद करत बालराजे आवारे पाटील यांची बाजू ठामपणे मांडली. त्यांच्या सातत्यपूर्ण कायदेशीर पाठपुराव्याला आणि मांडलेल्या युक्तिवादाला अखेर यश मिळाल्याची भावना समर्थकांनी व्यक्त केली. तसेच मराठा समाजाचे नेते अण्णासाहेब जाधव पाटील यांनी केलेले मार्गदर्शन, समन्वय आणि सहकार्यही या लढ्यात मोलाचे ठरल्याचे सांगण्यात आले. जामीन मंजूर झाल्यानंतर बाळराजे आवारे पाटील यांनी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे सहकार्य करणारे सर्व शिवप्रेमी, हितचिंतक, कायदेशीर मदत करणारे आणि नैतिक पाठिंबा देणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे मन :पूर्वक आभार मानले.







### अण्णासाहेब जाधव यांचे मोलाचे सहकार्य

### अण्णासाहेब जाधव, ॲड. प्रसाद ढिकले यांचे मोलाचे योगदानही विशेष उल्लेखनीय!!

या संपूर्ण प्रकरणात मराठा समाजाचे नेते अण्णासाहेब जाधव पाटील यांचे मार्गदर्शन, समन्वय आणि सातत्यपूर्ण सहकार्य मोलाचे ठरल्याची भावना समर्थकांनी व्यक्त केली. तसेच न्यायालयीन लढ्यात ॲड. प्रसाद ढिकले यांनी केलेली कायदेशीर बाजू प्रभावी मांडणी, सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि मोलाचे योगदानही विशेष उल्लेखनीय असल्याचे सांगण्यात आले. दरम्यान, जामीन मंजूर होणे म्हणजे संबंधित व्यक्ती निर्दोष ठरल्याचा अंतिम न्यायालयीन निर्णय नसून, प्रकरणाची सुनावणी पुढे न्यायालयात सुरू राहणार आहे.


---

## डॉ. प्रीतम मुंडे यांनी त्यांच्या कार्यकाळातील खासदार फंडातील संपूर्ण निधी केला खर्च!!

➤ **बीड : प्रतिनिधी**



बीड जिल्ह्याच्या तत्कालीन खासदार डॉ. प्रीतम मुंडे यांनी आपल्या खासदार फंडातील संपूर्ण निधी बीड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी खर्च केल्याचा दावा त्यांचे निकटवर्तीय कार्यकर्त्यांनी दैनिक 'वास्तव'शी बोलताना केला. दि. ९ जुलै २०२६ रोजी दैनिक 'वास्तव' मध्ये डॉ. प्रीतम मुंडे यांनी त्यांचा खासदार फंडातील काही निधी खर्च न केल्याने परत गेल्याचे वृत्त प्रकाशित केले होते. या अनुषंगाने प्रकाशित केलेल्या वृत्तामुळे डॉ. प्रीतम मुंडे यांच्या निकटवर्तीय कार्यकर्त्यांच्या भावना दुखावल्या गेल्या होत्या. त्यामुळे कार्यकर्त्यांच्या भावनांचा आदर करून हा खुलासा प्रकाशित करण्यात येत आहे. दरम्यान त्यांच्या निकटवर्तीय कार्यकर्त्यांनी दैनिक 'वास्तव'शी बोलताना सांगितले की, डॉ. प्रीतम मुंडे हे लोकाभिमुख आणि विकसनशील नेतृत्व आहे. त्यांच्या कार्यकाळात निधी वेळेत उपलब्ध न झाल्यामुळे त्यांनी सुचविलेल्या अनेक विकास कामांपैकी काही कामे पूर्ण झाली तर काही कामे अद्याप शिल्लक आहेत. अद्यापही त्यांचा काही निधी उपलब्ध असून या निधीमधून शिल्लक असलेली काही विकास कामेही लवकरच पूर्ण होतील, अशा भावना व्यक्त करण्यात आल्या आहेत.

सांज दैनिक बीड
# वास्तव

भारतरत्न रतनजी टाटा यांच्या महान देशभक्तीला समर्पित
एडिटर इन चिफ- जितेंद्र सिरसाट



# अवघे गरजे पंढरपुर चालला विठु नामाचा गजर

'अवघे गरजे पंढरपूर.. चालला नामाचा गजर' हे महाराष्ट्रातील विठ्ठल भक्तीचे आणि वारकरी संप्रदायाचे एक अत्यंत लोकप्रिय आणि सुप्रसिद्ध भक्तिगीत (नाट्यसंगीत) आहे. हे गीत 'संत गोरा कुंभार' या संगीत नाटकातील असून, विठ्ठलाच्या भक्तीत तल्लीन झालेल्या वारकऱ्यांच्या वारीचे आणि पंढरीच्या उत्साहाचे अप्रतिम वर्णन यात केले आहे.या गीताचे संपूर्ण शब्द खालीलप्रमाणे आहेत.

अवघे गरजे पंढरपूर, चालला नामाचा
गजtर || ध्रु. ||
टाळ घोष कानी येती, ध्यानी विठ्ठलाची
मूर्ती, पांडुरंगी जाहलो हो, चंद्रभागा
तीर,चालला नामाचा गजर || १ ||
इडापिडा टळुनी जाती, देहाला या लाभे
मुक्ती, नामरंगी रंगलो हो, संतांचे माहेर,
चालला नामाचा गजर || २ ||
देव दिसे ठाई ठाई, भक्तीने भक्ता
पायी,सुखालाही आला पूर, आनंदाचा
पूर,चालला नामाचा गजर || ३ ||

या भक्तीगीताचे गीतकार (कवी) अशोकजी परांजपे आहे.संगीतकार पं. जितेंद्र अभिषेकी.मूळ गायक- प्रकाश घांग्रेकर (तसेच शौनक अभिषेकी, स्वप्नील बांदोडकर आणि महेश काळे यांनीही हे गायले आहे)नाटक- संगीत संत गोरा कुंभार. विठ्ठल भक्तीबद्दल आपल्याला या गाण्याचा अर्थ समजून घ्यायचा आहे. अवघे गरजे पंढरपूर...'अवघे गरजे अवघे गरजे पंढरपूर.

वारी आणि विठ्ठलभक्तीचा अलौकिक सोहळा" या ओळी कानावर पडताच डोळ्यांसमोर उभी राहते ती आषाढी-कार्तिकीची विलोभनीय वारी, खांद्यावर घेतलेली भगवी पताका, कपाळावर बुक्का आणि गळ्यात तुळशीची माळ घालून पंढरीच्या वाटेने चालणारा अथांग वारकरी सागर! हे केवळ एक गाणे नाही, तर ती महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख आणि शतकानुशतके चालत आलेली भक्तीची एक जिवंत परंपरा आहे.

१. वारी: समतेचे आणि आनंदाचे महापीठ पंढरपूरची वारी. हे जगातील एक अनोखे मानवी आश्चर्य आहे. इथे ना कुणी श्रीमंत असतो, ना कुणी गरीब. जात, पात, धर्म या सगळ्या भिंती गळून पडतात आणि प्रत्येक जण एकमेकांच्या पाया पडतो. कारण प्रत्येक वारकऱ्याला समोरच्या माणसात 'माउली' म्हणजेच विठ्ठल दिसत असतो. 'टाळ घोष कानी येती, ध्यानी विठ्ठलाची मूर्ती' या शब्दांप्रमाणेच लाखो भाविक देहभान विसरून चंद्रभागेच्या तीराकडे ओढले जातात.

२. विठू माउली: संतांचे माहेर पंढरपूरला 'संतांचे माहेर' म्हटले गेले आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत चोखामेळा, संत गोरा कुंभार यांसारख्या अनेक संतांनी विठ्ठलाला केंद्रस्थानी ठेवून भक्तीची सोपी व्याख्या समाजाला शिकवली. विठ्ठल हा देव असूनही तो राजासारखा सिंहासनावर बसत नाही, तर तो विटेवर समचरण उभा राहून आपल्या भक्तांची वाट पाहत असतो. तो देवापेक्षाही 'माउली' (आई) म्हणून वारकऱ्यांच्या अधिक जवळचा आहे.

३. इडापिडा टळुनी जाती...वारीच्या वाटेवर शेकडो किलोमीटर चालताना वारकऱ्यांच्या पायाला फोड येतात, उन-पावसाचा मारा सोसावा लागतो. परंतु, मुखात असणाऱ्या "ज्ञानबा-तुकाराम" आणि "विठ्ठल विठ्ठल" या नामाच्या गजरामुळे थकवा कुठे पळून जातो, हे समजतही नाही. संसारातील सर्व दु:ख, विवंचना आणि 'इडापिडा' पंढरीच्या वेशीबाहेरच सुटतात. मनात शिल्लक राहतो तो केवळ सुखाचा आणि आनंदाचा महापूर ! निष्कर्ष 'अवघे गरजे पंढरपूर' हा केवळ नादाचा गजर नाही, तर तो अंत:करणाचा आवाज आहे. आजच्या आधुनिक आणि धावपळीच्या युगातही वारीची ही परंपरा तरुणांना आणि संपूर्ण समाजाला माणूसकी, संयम आणि निस्सीम भक्तीची शिकवण देते. चंद्रभागेच्या वाळवंटात एकत्र येणारा हा जनसागर हेच सिद्ध करतो की, जोपर्यंत जगात विठ्ठलाचा गजर सुरू आहे, तोपर्यंत माणुसकीचा आणि आनंदाचा हा झरा कधीही आटणार नाही.

हे गीत विठ्ठलाच्या भक्तीत लीन झालेल्या वारकऱ्यांची मन:स्थिती आणि पंढरीच्या वातावरणाचे वर्णन करते.

अवघे गरजे पंढरपूर, चालला नामाचा गजर ||

संपूर्ण पंढरपूर नगरी विठ्ठलाच्या नामघोषाने दुमदुमून (गाजते) गेली आहे. तिथे फक्त आणि फक्त "विठ्ठल विठ्ठल" याच नामाचा गजर आणि नाद ऐकू येत आहे.कडवे

टाळ घोष कानी याती, ध्यानी विठ्ठलाची
मूर्तीपांडुरंगी जाहलो हो, चंद्रभागा तीर, चालला
नामाचा गजर ||

कानावर सतत टाळ आणि मृदंगाचा सुंदर आवाज पडत आहे आणि मनात, डोळ्यांसमोर फक्त विठ्ठलाची ती साजिरी मूर्ती दिसत आहे. चंद्रभागेच्या तीरावर (किनाऱ्यावर) आल्यावर सर्व भक्त पांडुरंगाच्या भक्तीत इतके तल्लीन झाले आहेत की, ते स्वत:चे अस्तित्व विसरून विठ्ठलमय झाले आहेत.

इडापिडा टळुनी जाती, देहाला या लाभे
मुक्तीनामरंगी रंगलो हो, संतांचे माहेर, चालला
नामाचा गजर ||

पंढरीत पाऊल ठेवताच संसारातील सर्व दु:ख, संकटे आणि इडापिडा (सर्व त्रासांचे) निवारण होते. माणसाला आपल्या देहाच्या आणि मोहाच्या बंधनातून मुक्ती मिळाल्याचा आनंद होतो. पंढरपूर हे सर्व संतांचे 'माहेर' (माहेरघर) आहे. तिथे आल्यावर आम्ही सर्व जण विठ्ठलाच्या नामाच्या रंगात पूर्णपणे रंगून गेलो आहोत.

देव दिसे ठाई ठाई, भक्तीने भक्ता पायी सुखालाही
आला पूर, आनंदाचा पूर, चालला नामाचा गजर ||

भक्तांच्या निस्सीम भक्तीमुळे आता प्रत्येकाला प्रत्येक ठिकाणी, कणाकणात देव दिसायला लागला आहे. स्वत: विठ्ठल देखील आपल्या भक्तांच्या प्रेमापोटी त्यांच्या पायाशी लीन झाला आहे. या भक्तीच्या वातावरणामुळे इथे सुखाचा आणि परम आनंदाचा महापूर आला आहे. थोडक्यात सांगायचे तर, हे गाणे पंढरीच्या वारीत मिळणारा अलौकिक आनंद आणि विठ्ठल भेटीची ओढ यांचे अतिशय देखणे वर्णन करते.

हे गीत ऐकता ऐकता आपणही नकळतपणे पंढरपूरच्या होणाऱ्या नामगजरात केव्हा सामिल होवुन जातो कळतही नाही.

**दिलीप देशपांडे**
जामनेर, जिल्हा जळगाव
मो. ८९९९५६६९१७

वास्तव
सायं. दैनिक बीड वास्तव हे पत्र **मालक,मुद्रक, प्रकाशक जितेंद्र कान्होजीराव सिरसाट** शुभेच्छा प्रिंटिंग प्रेस एमआयडिसी. बीड -४३११२२ ( महाराष्ट्र ) येथे छापून बीड वास्तव ऑफिस बशीर गंज चौक, बीड ४३११२२ ( महाराष्ट्र ) येथून प्रसिद्ध केले. **संपादक - जितेंद्र कान्होजीराव सिरसाट, निवासी संपादक -अरविंद ओव्हाळ** ( या अंकामध्ये छापलेल्या मजकूराशी मालक संपादक प्रकाशक सहमत असतीलच असे नाही ) ( वाद-विवाद बीड न्याय कक्षेत ) मो. 9022952922

विशेष

## शिवसेना कायदे विभागाच्या माजलगाव विधानसभा अध्यक्षपदी ॲड. महेश कुंभार, तालुकाध्यक्षपदी ॲड. गौतम मिसाळ


ॲड. गौतम मिसाळ


ॲड. महेश कुंभार

**माजलगाव / प्रतिनिधी :** शिवसेना कायदे विभागाच्या माजलगाव विधानसभा अध्यक्षपदी ॲड. महेश शिवलिंग कुंभार, तर माजलगाव तालुकाध्यक्षपदी ॲड. गौतम मिसाळ यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीची पत्रे दि. २१ जुलै २०२६ रोजी प्रदान करण्यात आली.

ही नियुक्ती शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांवर तसेच शिवसेना मुख्य नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार करण्यात आल्याचे नियुक्तीपत्रात नमूद करण्यात आले आहे. नियुक्तीनंतर ॲड. महेश कुंभार आणि ॲड. गौतम मिसाळ यांनी बाळासाहेब ठाकरे यांच्या हिंदुत्वाच्या विचारांचा व धर्मवीर आनंद दिघे यांच्या शिकवणीचा प्रसार करत शिवसेना व कायदे विभागाची संघटना अधिक बळकट करण्यासाठी सर्वांना सोबत घेऊन कार्य करण्याचा विश्वास व्यक्त केला. नियुक्तीपत्रात दर महिन्याला केलेल्या कामाचा लेखी अहवाल बाळासाहेब भवन कार्यालयात सादर करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. ही नियुक्तीपत्रे शिवसेना कायदे विभागाचे अध्यक्ष ॲड. हेमंत केंजाळकर व सचिव ॲड. अनिल दळवी यांच्या स्वाक्षरीने, शिवसेना सचिव संजय मोरे, मंत्री भारत गोगावले आणि जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आली. या नियुक्तीबद्दल शिवसैनिक आणि पदाधिकाऱ्यांनी ॲड. महेश कुंभार व ॲड. गौतम मिसाळ यांचे अभिनंदन केले.

### महत्वाचे ठळक मुद्दे
- ॲड. महेश कुंभार यांची विधानसभा अध्यक्षपदी नियुक्ती.
- ॲड. गौतम मिसाळ यांची तालुकाध्यक्षपदी नियुक्ती.
- नियुक्तीपत्रे २१ जुलै रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदान.
- संघटना बळकट करण्यासाठी कार्य करण्याचा नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा निर्धार.

## महाराष्ट्र लोकसेवा आयोग मार्फत अनंत भीमराव गोरेमाळी यांची ड्रग इन्स्पेक्टर पदी निवड



**केज :** केज तालुक्यातील बनसारोळा गावचे सुपुत्र अनंत भीमराव गोरेमाळी यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोग महाराष्ट्र लोकसेवा आयोग मार्फत ड्रग इन्स्पेक्टर पदावर निवड झाल्याने गावासह संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. अनंत गोरेमाळी यांनी जिद्द, कठोर परिश्रम आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या बळावर हे यश संपादन केले आहे. ग्रामीण भागातून उच्च पदावर निवड होणे ही बनसारोळा गावासाठी अभिमानाची बाब मानली जात असून त्यांच्या यशामुळे स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना नवी प्रेरणा मिळाली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल गावातील ग्रामस्थ, मित्रपरिवार, नातेवाईक तसेच विविध सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील शासकीय सेवेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. अनंत गोरेमाळी यांच्या निवडीमुळे बनसारोळा गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, त्यांच्या यशाचा संपूर्ण केज तालुक्याला अभिमान वाटत आहे. त्यांच्या कर्तृत्वामुळे ग्रामीण भागातील युवकांनी स्पर्धा परीक्षांकडे आत्मविश्वासाने वाटचाल करावी, असा संदेशही या यशातून मिळत आहे.

# वंचित बहुजन आघाडीने पुकारलेल्या केज बंदला व्यापारी व नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

### विविध सामाजिक संघटना, राजकीय पक्ष, व्यापाऱ्यासह विद्यार्थ्यांचा सहभाग





**केज/प्रतिनिधी** नवी दिल्ली येथे जंतर-मंतर मैदानावर कॉकरोच पार्टीचे संस्थापक अध्यक्ष अभिजीत दिपके व ज्येष्ठ साहित्यिक संशोधक सोनम वांगचुक यांच्यासह विद्यार्थ्यांचे गेल्या अनेक दिवसापासून आंदोलन शांततेत सुरू असून लाखोच्या संख्येने विद्यार्थी हे आपल्या न्याय्य हक्कांसाठी शांततापूर्ण संविधानिक पद्धतीने शांततेच्या मार्गाने आंदोलन करणाऱ्या आंदोलक, विद्यार्थ्यांवर झालेल्या अमानुष लाठीचार्जच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांनी दिनांक २३ रोजी महाराष्ट्र बंदचे आवाहन केले. ॲड. प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत दिनांक २३ जुलै २०२६ केज शहरात शांततेत बंद पाळण्यात आला. या बंदला सर्व संघटना, राजकीय पक्ष, व्यापारी, विद्यार्थी व नागरिक आणि ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांच्यावर प्रेम करणाऱ्या जनतेने उत्स्फूर्तपणे प्रतिसाद देवून आंदोलनाला जाहीर पाठिंबा दर्शविला आहे.

गुरुवार रोजी सकाळी ११ ते ११-१५ वाजण्याच्या सुमारास शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करून सुरुवात करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौका पासुन रॅली मंगळवार पेठ मार्गे मंगळवार पेठ कॉर्नर मार्गे मुख्य रस्त्याने कानडी चौक मार्गे कानडी रोड, परत याच मार्गाने राष्ट्रसंत भगवान बाबा चौक मार्गे मुख्य रस्त्याने छत्रपती शिवाजी चौक मार्गे तहसील कार्यालय येथे रॅली काढण्यात आली या रॅलीमध्ये जय भीम, जय संविधान यासह इतर नाऱ्याने व घोषणांनी संपुर्ण केज दुमदुमून गेले होते. केज शहरातील व्यापाऱ्यांनी रॅलीमध्ये सहभागी होत स्वयंपूर्ण स्वत :चे व्यवसाय बंद करून सदरील बंद मध्ये सहभागी झाले होते.

रॅली तहसीलकार्यालया समोर पोहोचल्यानंतर सर्व संघटना डाव्या पक्षांच्या लोकप्रतिनिधींनी आंदोलनात सहभागी होऊन जाहीर पाठिंबा दिला. व दिल्ली येथे जंतर मंतर येथे चालू असलेल्या आंदोलनात विद्यार्थ्यावर झालेल्या हल्ल्याचा निषेध व्यक्त केला. वंचित बहुजन आघाडीचे व पाठिंबा दर्शविलेल्या सर्व संघटना आणि पक्षाचे निवेदन तहसीलचे नायब तहसीलदार अशोक भंडारे यांनी स्वीकारले. लेखी दिलेल्या निवेदनात म्हटले की, विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याऐवजी त्यांच्यावर बलप्रयोग करणे हा भारतीय लोकशाही, संविधान आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गंभीर आघात असून या घटनेची उच्चस्तरीय न्यायालयीन चौकशी करण्यात यावी, दोषी अधिकाऱ्यांवर कठोरातील कठोर कारवाई करावी करण्यात यावी, विद्यार्थ्यांच्या न्याय्याच्या, मागण्या तातडीने मान्य करण्यात यावात, केंद्रीय शिक्षण मंत्र्यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून तात्काळ राजीनामा द्यावा, भविष्यात अशा घटना घडणार नाहीत. याची शासनाने हमी द्यावी, त्याचबरोबर संपूर्ण घटनेची नैतिक व राजकीय जबाबदारी स्वीकारून पंतप्रधानांनीही राजीनामा द्यावा, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत.

- केज बंद च्या आंदोलनाला भारतीय बौद्ध महासभा तालुका शाखा व शहर शाखा, जन विकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख हारुणभाई इनामदार, राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे, शरदचंद्र पवार राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या बीड जिल्हा महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा नसरीन बानू बागवान, शेतकरी कामगार पक्षाचे राज्य सरचिटणीस भाई मोहन गुंड, बहुजन विकास मोर्चाचे तालुकाध्यक्ष लखन हजारे, प्राचार्य डॉ. हनुमंत सौदागर, सामाजिक कार्यकर्ते प्राध्यापक हनुमंत भोसले यांच्यासह सर्व संघटना व डाव्या पक्षांच्या लोकप्रतिनिधी, पदाधिकाऱ्यांनी जाहीर पाठिंबा देऊन दिल्ली येथे जंतर मंतर मैदानावर सुरू असलेल्या आंदोलनातील विद्यार्थ्यांवर झालेल्या हल्ल्याचा जाहीर निषेध दर्शवून वरील मागणीस समर्थन दर्शविले. जर प्रशासनाने वरील मागण्या तात्काळ मंजूर न केल्यास यापुढे रस्त्यावर उतरून मोठे जन आंदोलन करण्यात येईल असा शासन प्रशासनाला इशारा देण्यात आला.
- या आंदोलन रॅलीमध्ये सर्व संघटना, डाव्या आघाडी पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते, व्यापारी, विद्यार्थी व वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते आणि भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी त्याचबरोबर ॲड. प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांच्यावर प्रेम करणारे नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.
- सदरील मोर्चा रॅली हे शांततेत पार पडली या बंदसाठी वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी अथक परिश्रम घेतले. सदरचा बंद आंदोलन यशस्वी पार पाडले. या अंदोलनाचा समारोप राष्ट्रगीताने करण्यात आला. या मोर्चा दरम्यान कुठलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिस प्रशासनाकडून मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

## कन्नड पंचायत समितीतर्फे ७९ दिव्यांग विद्यार्थ्यांना अलीम्को सहाय्यक साहित्याचा लाभ; पुढील टप्प्यात सहाय्यक साहित्य वितरित करण्यात येणार



**कन्नड / प्रतिनिधी :** कन्नड पंचायत समितीच्या शिक्षण विभाग, समग्र शिक्षा अभियान आणि अलीम्को यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शिबिरात तालुक्यातील ७९ दिव्यांग विद्यार्थ्यांची तपासणी करून त्यांच्या गरजेनुसार विविध सहाय्यक साधनांसाठी मोजमाप घेण्यात आले.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. एम. मिन्नू, शिक्षणाधिकारी अश्विनी लाठकर, गटशिक्षणाधिकारी सबाहत शेख यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांनी विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी केली. व्हीलचेअर, ट्रायसायकल, श्रवणयंत्र, स्मार्ट काठी, वॉकर, कुबड्या, सी.पी. चेअर व इतर आवश्यक साहित्यांसाठी मोजमाप घेण्यात आले. मोजमाप प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पात्र विद्यार्थ्यांना पुढील टप्प्यात सहाय्यक साहित्य वितरित करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षण विभाग, विशेष शिक्षक, मुख्याध्यापक व अलीम्कोच्या तांत्रिक पथकाने सहकार्य केले.

# नातीच्या दहाव्यासाठी जात असताना आजीचा अपघाती मृत्यू

### नागरगोजे परिवारावर दहा दिवसांत दुसरा दु:खद आघात

**माजलगाव : प्रतिनिधी** धारूर पंचायत समितीचे माजी सभापती हनुमंत नागरगोजे यांच्या परिवारावर अवघ्या दहा दिवसांत दुसऱ्यांदा दु:खाचा डोंगर कोसळला आहे. मुलगी शितल ठोंबरे यांच्या अपघाती निधनानंतर त्यांच्या दहाव्याच्या कार्यक्रमासाठी जात असताना शितल यांच्या आजी पद्मिनीबाई त्र्यंबक डोंगरे (रा. घागरवाडा, ता. धारूर) यांचा दुचाकीच्या धडकेत मृत्यू झाला.

मिळालेल्या माहितीनुसार, शितल ठोंबरे यांचे दहा दिवसांपूर्वी धारूर येथे सकाळी फिरण्यासाठी जात असताना भरधाव वाहनाच्या धडकेत निधन झाले होते. त्यांच्या दहाव्याचा कार्यक्रम गुरुवारी (दि. २३) माजलगाव तालुक्यातील मंजरथ येथे आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी नागरगोजे व ठोंबरे परिवार वाहनाने निघाला असताना तेलगाव येथील पेट्रोल पंपावर इंधन भरण्यासाठी थांबले.



यावेळी पद्मिनीबाई डोंगरे या वाहनातून खाली उतरल्या असता, माजलगावच्या दिशेने भरधाव येणाऱ्या अज्ञात दुचाकीने त्यांना जोरदार धडक दिली. अपघातात त्या गंभीर जखमी झाल्या. त्यांना तातडीने माजलगाव येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

शवविच्छेदनानंतर त्यांच्यावर घागरवाडा येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. अवघ्या दहा दिवसांच्या कालावधीत मुलगी आणि सासूबाई अशा दोन जवळच्या व्यक्तींचा अपघाती मृत्यू झाल्याने नागरगोजे, ठोंबरे आणि डोंगरे परिवारावर शोककळा पसरली असून परिसरातून हळहळ व्यक्त होत आहे.

या प्रकरणाचा अधिक तपास दिंद्रुड पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक महेश भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी करीत आहेत.

### ठळक मुद्दे
- नातीच्या दहाव्यासाठी जात असताना पद्मिनीबाई डोंगरे यांचा अपघाती मृत्यू.
- तेलगाव येथील पेट्रोल पंपासमोर अज्ञात दुचाकीची धडक.
- दहा दिवसांपूर्वीच नात शितल ठोंबरे यांचेही अपघाती निधन.
- सलग दोन दुर्घटनांमुळे नागरगोजे, ठोंबरे व डोंगरे परिवारावर शोककळा.
- दिंद्रुड पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## आषाढी एकादशीनिमित्त फ्लाईंग बर्ड्स अकॅडमीची भव्य दिंडी; भक्तिमय वातावरणात ७०० बालवारकऱ्यांचा सहभाग






**माजलगाव : अरविंद ओव्हाळ** आषाढी एकादशीनिमित्त वारकरी संप्रदायाचा समता, बंधुता आणि भक्तीचा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावा, या उद्देशाने शहरातील फ्लाईंग बर्ड्स अकॅडमी (भाटवडगाव) च्या वतीने भव्य पायी दिंडीचे आयोजन करण्यात आले. मागील ११ वर्षांपासून सुरू असलेला हा उपक्रम यंदाही उत्साहपूर्ण, भक्तिमय आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडला. शाळा परिसरातून बायपास मुख्य रस्त्यावरील मंगलनाथ मंदिरापर्यंत काढण्यात आलेल्या या दिंडीत इयत्ता दुसरी ते दहावीपर्यंतचे सुमारे ७०० विद्यार्थी वारकरी वेशात सहभागी झाले होते. पूर्वप्राथमिक व प्राथमिक विभागासह एकूण १,००० हून अधिक विद्यार्थ्यांनी या सोहळ्यात सहभाग नोंदविला. दिंडीतील विठ्ठल-रुक्मिणीची आकर्षक पालखी, टाळ-मृदंगाचा निनाद, डोक्यावर तुळशीवृंदावन, कपाळावर गोपीचंदन आणि "ज्ञानबा-तुकाराम", "विठ्ठल-विठ्ठल"च्या जयघोषाने माजलगाव नगरी भक्तिरसात न्हाऊन निघाली. छत्रपती संभाजी महाराज चौकात विद्यार्थिनींनी अभंगांच्या तालावर फुगडी, रिंगण आणि शारीरिक कवायती सादर करून उपस्थितांची मने जिंकली. या सादरीकरणाला नागरिकांनी उत्स्फूर्त दाद दिली.

### महत्वाचे ठळक मुद्दे
- आषाढी एकादशीनिमित्त फ्लाईंग बर्ड्स अकॅडमीची पारंपरिक पायी दिंडी.
- सुमारे ७०० विद्यार्थी वारकरी वेशात सहभागी, एकूण १,००० हून अधिक विद्यार्थ्यांची उपस्थिती.
- विठ्ठल-रुक्मिणी पालखी, टाळ-मृदंग, अभंग आणि जयघोषाने शहर भक्तिमय.
- आरोग्य, स्वच्छता आणि सामाजिक समतेचे प्रभावी संदेश.
- सलग ११ वर्षांपासून उपक्रमाचे सातत्य.



दिंडीत सामाजिक संदेशांनाही विशेष महत्त्व देण्यात आले. डॉक्टरांच्या वेशभूषेतील विद्यार्थिनींनी "आरोग्य हीच संपत्ती" हा संदेश देत प्रथमोपचाराचे महत्त्व पटवून दिले. तर स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या वेशातील विद्यार्थ्यांनी दिंडी मार्गावरील कचरा गोळा करून "स्वच्छता हीच ईश्वरसेवा" हा संदेश प्रभावीपणे दिला. या उपक्रमाचे नागरिकांनी विशेष कौतुक केले. बालवयात विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार व्हावेत, त्यांना महाराष्ट्राच्या समृद्ध वारकरी परंपरेची ओळख व्हावी आणि सामाजिक समतेचे मूल्य रुजावे, या उद्देशाने हा उपक्रम दरवर्षी आयोजित केला जात असल्याचे शाळा प्रशासनाने सांगितले.

या दिंडीचे नियोजन संस्थापक पांडुरंग चांडक, जगदीश चांडक, मुख्याध्यापिका सारिका बजाज, सचिन गायकवाड, ज्योती बनसोडे, रमेश बाहेती तसेच शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी केले. यावेळी संचालक अण्णासाहेब तौर, प्रभाकर शेटे, नामदेव लव्हाळे यांच्यासह अनेक पालक उपस्थित होते.

परिशिष्ट-4
महाराष्ट्र शासन
जारसंपदा विभाग
कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग,
बीड पत्ता: जायकवाडी वसाहत, नगर रोड, बीड-431122

ई-मेल पत्ता :- mdbeed12@gmail.com दुरध्वनी (०२४६१) २६०३६१ G.S.T.NO.27AAALE0153G1ZL
वी-1 निविदा सुचना क्रमांक १५ सन २०२६-२०२७ (प्रथम वेळ)

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, बीड, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता निविदा मागवित आहेत. सविस्तर निविदा सुचना शासनाच्या pttps://wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे. निविदा स्वीकारण्याच्या अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांत्रिकी विभाग, बीड यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकाराली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकावर उपलब्ध करून देण्यात येईल.
टिप :- निविदा सादर करणारे कंत्राटदार हे जलसंपदा विभागातील यांत्रिकी संघटनेकडे पंजीकृत असणे आवश्यक नाही.

कामाचे नांव

काम क्र.१
१५/०१ गोलंग्री लघु प्रकल्प ता. जि. बीडच्या कालव्यावरील मुख्य विमोचक द्वार 0.9×0.9 मी- 01 नग, स्क्रू स्टेम उच्चालक 5 मे. टन क्षमता, विमोचक विहरीवरील रेलींग, सुरक्षा जाळी व इतर अनुषंगीक दुरुस्ती.

काम क्र.२
१५/०२ मस्सेवाडी लघु प्रकल्पाच्या कालव्यावरील मुख्य विमोचक द्वार 0.9 x 0.9 मी- 01 नग, स्क्रू स्टेम उच्चालक 5 मे. टन क्षमता, विमोचक विहरीवरील रेलींग, सुरक्षा जाळी व इतर अनुषंगीक दुरुस्ती.

काम क्र.३
१५/०३ खटकळी लघु प्रकल्प मुख्य कालव्यावरील विमोचक द्वार 0.9 x 0.9 मी- 01 नग, स्क्रू स्टेम उच्चालक 5 मे. टन क्षमता, विमोचक विहरीवरील रेलॉग, सुरक्षा जाळी व इतर अनुषंगीक दुरुस्ती.

जिल्हा :- बीड

- वी. । निविदेची किंमत (वस्तु व सेवाकर वगळून)
काम क्र.१ :- रुपये. ६,१७,०५७/- काम क्र.२ :- रुपये. ४,९१,३५३/- काम क्र.३ :- रुपये. ७,६६,२७४/-

- वी. । निविदा विक्रीचा कालावधी : दि. १५/०७/२०२६ ते दि. २२/०७/२०२६
- वी. । निविदा विक्रीच्या कालावधीनंतर (दोन दिवसांनी)
- निविदा सादर करण्याचा अंतीम दिनांक २४/०७/२०२६ वेळ सायंकाळी १८ : १५ पर्यंत
- वी. । निविदा उघडण्याचा दिनांक :- दि. २७/०७/२०२६ रोजी सकाळी ११ :०० वाजता (शक्य झाल्यास)

जा.क्र.यांविनां/भांशा/ दिनांक
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, यांत्रिकी विभाग, बीड

(म.दा. सुर्यवंशी)
कार्यकारी अभियंता यांत्रिकी विभाग, बीड



# पैठण पंचायत समितीतील कथित गैरव्यवहारप्रकरणी तीव्र आंदोलन व निदर्शने

पैठण/ प्रतिनिधी : महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ( मनरेगा ) अंतर्गत पैठण तालुक्यात सन २०२० ते २०२५ या कालावधीत मंजूर झालेल्या सिमेंट रस्ते, गाय गोठा व सिंचन विहीर योजनांमध्ये कथित गैरव्यवहार झाल्याचा आरोप करत सामाजिक कार्यकर्ते लाभार्थी शेतकऱ्यांच्या वतीने शुक्रवारी पंचायत समिती कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करत निदर्शने करण्यात आली.

पैठण गटविकास अधिकारी यांना आंदोलनकर्त्यांनी दिलेल्या निवेदनात, सन २०२०ते २५ या कालावधीमध्ये मंजूर झालेल्या गाय गोठा, सिंचन विहीर व सिमेंट रस्ते या योजनांच्या मंजुरीसाठी आवश्यक असलेल्या जीएसटी बिलांमध्ये अभियंते व मनरेगा विभागातील काही संबंधित अधिकाऱ्यांनी संगनमत करून कथित बोगस जीएसटी बिले अपलोड केल्याचा गंभीर आरोप केला. त्यांच्या या बोगसगिरीमुळे



शासनाची आर्थिक फसवणूक होऊन यामुळे तालुक्यातील अनेक लाभार्थी शेतकऱ्यांनाही याचा आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागल्याचे या निवेदनात नमूद केले आहे. तसेच संबंधितांकडून गाय गोठा योजनेसाठी प्रति लाभार्थी सुमारे ५,००० आणि सिंचन विहीर योजनेसाठी २०,००० अशी रक्कम उकळल्याचा गंभीर आरोपही यावेळी त्यांच्याकडून करण्यात आला आहे. या कथित गैरव्यवहाराची चौकशी करून संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी यापूर्वीही करण्यात आली होती. मात्र, सात ते आठ महिने उलटूनही कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने आम्हाला आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागल्याचे यावेळी आंदोलकांनी सांगितले. या आंदोलनात पवन शिसोदे, सुभाष नवथर, विशाल काळे, साईनाथ कर्डिले, संतोष खराद, किशोर दसपुते, शेखर देशमुख, आदित्य कोळगे यांच्यासह अनेक शेतकरी लाभार्थ्यांसह नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## जंतर-मंतर लाठीचार्जच्या निषेधार्थ धारूर शहर कडकडीत बंद; वंचित बहुजन आघाडीच्या आंदोलनाला उत्स्फूर्त प्रतिसाद

➤ धारूर / प्रतिनिधी : दिल्लीतील जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या आंदोलनादरम्यान आंदोलनकर्त्यांवर झालेल्या कथित अमानुष लाठीचार्जच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीच्या वतीने दि. २३ जुलै रोजी धारूर शहर कडकडीत बंद पाळण्यात आला. या बंदला शहरातील व्यापारी, विविध सामाजिक संघटना, युवक तसेच नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्याने शहरातील बहुतांश व्यावसायिक आस्थापने दिवसभर बंद ठेवण्यात आली.

वंचित बहुजन आघाडीच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आलेल्या या आंदोलनात केंद्र सरकारच्या भूमिकेविरोधात तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. जंतर-मंतर येथे आपल्या न्याय्य मागण्यांसाठी शांततेच्या मार्गाने आंदोलन करणाऱ्या आंदोलनकर्त्यांवर करण्यात आलेल्या कारवाईचा निषेध करत दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच आंदोलनकर्त्यांना न्याय मिळावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

या आंदोलनात वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष प्रशांत उघडे, शहराध्यक्ष आकाश गायसमुद्रे, रानबाजी उजगरे, बाबुराव मस्के, अनिल गायकवाड, बाळासाहेब उजगरे, आदित्य गायसमुद्रे, अजय गायसमुद्रे, विनायक शिरसाठ, धीरज गायसमुद्रे, संदीप गायसमुद्रे, राज सरवदे, अजिंक्य वाघमारे, गणेश वाघमारे, राज शिरसाट, करण शिरसाठ, कपिल शिरसाठ, जिजा शिरसाठ यांच्यासह अनेक भीमसैनिक, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

आंदोलनादरम्यान कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी करत जंतर-मंतर येथील घटनेचा निषेध नोंदविला. आंदोलन शांततेच्या मार्गाने पार पडले. शहरातील विविध भागांतून नागरिकांनी आंदोलनाला पाठिंबा दर्शवित बंद यशस्वी करण्यासाठी सहकार्य केले. अनेक व्यापाऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने दुकाने बंद ठेवून आंदोलनाला नैतिक समर्थन दिले.

वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, लोकशाही व्यवस्थेत प्रत्येक नागरिकाला संविधानाने शांततेच्या मार्गाने आंदोलन करण्याचा अधिकार दिला आहे. अशा परिस्थितीत आंदोलनकर्त्यांवर बळाचा वापर होणे ही अत्यंत गंभीर बाब असून अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी संबंधितांवर कठोर कारवाई करणे आवश्यक आहे. तसेच आंदोलनकर्त्यांच्या मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय घेण्याची मागणीही करण्यात आली.

धारूर शहरातील कडकडीत बंद शांततेत आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडला. बंद यशस्वी होण्यासाठी सहकार्य करणारे व्यापारी, सामाजिक संघटना, युवक, भीमसैनिक तसेच सकल धारूरवासीयांचे वंचित बहुजन आघाडीच्या वतीने मन:पूर्वक आभार व्यक्त करण्यात आले. या आंदोलनामुळे शहरात दिवसभर जंतर-मंतर येथील घटनेबाबत चर्चा रंगली असून लोकशाही मूल्यांचे संरक्षण आणि संविधानिक अधिकारांचा सन्मान राखण्याची गरज अनेकांनी व्यक्त केली.

## धर्माबाद येथील ऐतिहासिक मराठवाडा व्यापारी परिषदेस माजलगावातून शेकडो व्यापाऱ्यांची उपस्थिती

➤ माजलगाव : प्रतिनिधी नांदेड जिल्ह्यातील धर्माबाद येथे रविवारी ( दि. २६ जुलै ) आयोजित करण्यात आलेल्या भव्य मराठवाडा व्यापारी परिषदेस माजलगाव तालुक्यातील शेकडो व्यापारी उपस्थित राहणार असून, ही परिषद व्यापाऱ्यांच्या विविध प्रश्नांवर सरकारचे लक्ष वेधणारी ऐतिहासिक परिषद ठरणार असल्याचा विश्वास व्यापारी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. धर्माबाद व्यापारी महासंघाच्या वतीने आयोजित या परिषदेत महावितरणचे ग्रिड सपोर्टिंग चार्ज, व्यवसाय कर, बाजार समितीशी संबंधित



सुरेंद्र रेदासनी



जफर मिर्झा

प्रश्न, जीएसटीतील किचकट अटी, व्यापाऱ्यांसाठी पेन्शन योजना तसेच व्यापारी वर्गाच्या इतर विविध प्रलंबित मागण्यांवर सविस्तर चर्चा होणार असून, शासनाकडे ठोस मागण्या मांडल्या जाणार आहेत.

रविवारी सकाळी १० वाजता धर्माबाद येथे होणाऱ्या या परिषदेस माजलगाव तालुक्यातील व्यापाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन तालुका व्यापारी महासंघाचे अध्यक्ष तथा मराठवाडा चेंबरचे वरिष्ठ उपाध्यक्ष सुरेंद्र रेदासनी आणि मराठवाडा चेंबरचे सचिव जफर मिर्झा यांनी केले आहे. व्यापाऱ्यांच्या विविध समस्या शासनापर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी ही परिषद महत्त्वाची ठरणार असल्याने सर्व व्यापारी बांधवांनी या परिषदेत सहभागी होण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## प्रख्यात कीर्तनकार गणेश महाराज बोचरे यांचे उद्या नागझरी येथे कीर्तन

➤ गेवराई / प्रतिनिधी : साष्ट पिंपळगाव येथील प्रख्यात कीर्तनकार तथा मराठा योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या मराठा आंदोलनातील सूत्रसंचालक ह. भ. प. गणेश महाराज बोचरे यांचे उद्या



रविवार दिनांक २६ जुलै रोजी गेवराई तालुक्यातील नागझरी येथे सकाळी दहा ते बारा या वेळेत कीर्तन होणार आहे. या कीर्तनाचा लाभ भाविकांनी घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे. ह.भ.प. गणेश महाराज बोचरे हे नामांकित कीर्तनकार आहेत. मराठा योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या लढ्यामध्ये त्यांनी खूप मोठे योगदान दिलेले आहे. साष्ट पिंपळगाव येथील आंदोलनाचे पूर्ण सूत्रसंचालन त्यांनी केले होते. तसेच आंतरवली सराटी येथील नियोजनातही त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. त्या ठिकाणी झालेल्या कीर्तन मालिकेमधील सर्व नियोजन त्यांनीच केले होते. मागील अनेक वर्षापासून ते या लढ्यामध्ये सक्रिय आहेत. वारकरी संप्रदायामध्ये त्यांनी आतापर्यंत खूप मोठे योगदान दिलेले आहे. गेवराई तालुक्यातील नागझरी येथील प्रतिष्ठित आणि बुजुर्ग व्यक्तिमत्व कै आप्पासाहेब नामाजी शिंदे पाटील यांच्या पुण्यस्मरणानिमित्त रविवार दिनांक २६ जुलै रोजी सकाळी दहा ते बारा या वेळेत प्रख्यात कीर्तनकार गणेश महाराज बोचरे यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. या कीर्तनानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे. सर्व भाविकांनी कीर्तन श्रावणाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन या कार्यक्रमाचे संयोजक अॅड नारायण आप्पासाहेब शिंदे व शिवाजी आप्पासाहेब शिंदे यांनी केले आहे.

## लाठीमाराच्या निषेधार्थ माजलगावात एसएफआय व डीवायएफआय चे शैक्षणिक बंद पाळुन आंदोलन

### मोहन जाधव यांनी केली शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी

माजलगाव / प्रतिनिधी : दिल्ली येथील जंतर-मंतरवर विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित लाठीमाराच्या निषेधार्थ माजलगाव शहरात स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया आणि डेमोक्रॅटिक यूथ फेडरेशन ऑफ इंडिया युवा संघटना यांच्या वतीने शाळा, कॉलेज बंद करून तीव्र निदर्शने करण्यात आली. या आंदोलनाचे नेतृत्व मोहन जाधव यांनी केले. यावेळी आंदोलकांनी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून तात्काळ राजीनामा द्यावा अशी मागणी केली.

आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांवरील लाठीमाराचा निषेध व्यक्त करत, विद्यार्थ्यांच्या



न्याय्य मागण्यांकडे दुर्लक्ष करून त्यांच्यावर बळाचा वापर करणे ही लोकशाहीविरोधी कृती असल्याचे आंदोलकांनी सांगितले. विद्यार्थ्यांना शांततेच्या मार्गाने आंदोलन करण्याचा घटनात्मक अधिकार असून, त्यांच्या आवाजाचे दमन करण्याचा प्रयत्न अस्वीकार्य असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले. यावेळी मोहन जाधव म्हणाले की विद्यार्थ्यांच्या प्रश्नांची उत्तरे देण्याऐवजी त्यांच्यावर लाठीमार करण्यात आला. या घटनेची जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी तात्काळ राजीनामा द्यावा. विद्यार्थ्यांवरील कारवाईची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी. आंदोलनात युवा संघटनेचे जिल्हा अध्यक्ष सुहास झोडगे, महेबुब शेख, फारुख सय्यद, एसएफआयचे जिल्हा सचिव पवन चिंचाने, यशवंत संक्राते, ओंकार टकले, महादेव इंगळे व कृष्णा इंगळेसह विद्यार्थी व युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. आंदोलकांनी शैक्षणिक बंद पाळुन प्रशासनामार्फत केंद्र सरकारला निवेदन पाठवून विद्यार्थ्यांवरील कारवाईचा निषेध नोंदविला.

## सुरक्षिततेच्या नावाखाली लावलेला सीसीटीव्ही कॅमेरा ठरला चिंतेचं साधन

मुंबई : घर, दुकान, हॉटेल, कार्यालय आदी ठिकाणी सुरक्षेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे ही आता सामान्य बाब झाली आहे.

हे सीसीटीव्हीकॅमेरे थेट प्रायव्हसीवर घाला घालतात असा विचारही कोणी करत नाही. पण मुंबईजवळच्या मीरा रोड येथे असा एक धक्कादायक प्रकार घडला आहे.

शेजाऱ्यांच्या घराबाहेर लावलेला सीसीटीव्ही कॅमेरा हा सुरक्षेसाठी असल्याचे मत घरात राहणाऱ्यांचे होते. पण तोच कॅमेरा प्रायव्हसीचा भंग करत आहे हे लक्षात आल्यावर स्थानिकांच्या पायाखालची जमीन सरकली.

## पंढरीचा छोटा वारकरी'... विठ्ठलभक्तीचा मोहक अंदाज

### चिंचगव्हानचा चिमुकला वारकरी; अथर्वच्या भक्तिमय वेशभूषेचे कौतुक

➤ माजलगाव : प्रतिनिधी आषाढी वारीच्या भक्तिमय वातावरणात चिंचगव्हान येथील ची. अथर्व रोहन अकुसकर याने वारकरी वेशभूषा परिधान करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. कपाळी टिळा, गळ्यात तुळशीमाळ, अंगावर पारंपरिक पांढरा पोशाख आणि मुखावर निरागस हास्य अशा रूपात अथर्वने विठ्ठलभक्तीची सुंदर झलक साकारली. त्याच्या या आकर्षक वेशभूषेचे ग्रामस्थ व नातेवाईकांकडून कौतुकy होत असून, वारकरी परंपरेबद्दलची श्रद्धा आणि संस्कार जपणारा हा उपक्रम सर्वांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. "पंढरीचा वारकरी... पायी चालतो पंढरी, मुखी विठ्ठल नाम, हृदयी भक्तीभाव!"



"छोटे पाऊल, मोठी भक्ती... विठ्ठल-रखुमाईच्या चरणी समर्पित पंढरीचा चिमुकला वारकरी."

## लोहगावच्या जुगार अड्ड्यावर पिशोर पोलिसांचा छापा; ५.१९ लाखांचा मुद्देमाल जप्त, ११ जणांवर गुन्हा

➤ कन्नड : प्रतिनिधी कन्नड तालुक्यातील पिशोर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील लोहगाव शिवारात सुरू असलेल्या अवैध जुगार अड्ड्यावर पिशोर पोलिसांनी धाड टाकून ११ जणांविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईत रोख रक्कम, मोबाईल फोन, मोटारसायकली आणि जुगाराचे साहित्य असा एकूण ५ लाख १९ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २२ जुलै रोजी दुपारी लोहगाव शिवारातील संतोष कडुबा पारखे यांच्या शेतात काही जण "झन्ना-मन्ना" हा पैशांचा जुगार खेळत असल्याची गोपनीय माहिती पिशोर पोलिसांना मिळाली होती. माहितीची खातरजमा केल्यानंतर सहाय्यक पोलीस निरीक्षक




कुणाल सूर्यवंशी यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांनी घटनास्थळी छापा टाकला.

कारवाईदरम्यान घटनास्थळावरून ११ जणांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडून रोख रक्कम, मोबाईल फोन, मोटारसायकली, ५२ पत्त्यांचा कॅट तसेच जुगारासाठी वापरण्यात येणारे इतर साहित्य जप्त करण्यात आले. जप्त मुद्देमालाची एकूण किंमत ५,१९,७०० रुपये असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

याप्रकरणी संबंधित आरोपींविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पिशोर पोलीस ठाण्याकडून सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत स्वामी तसेच सहाय्यक पोलीस अधीक्षक अपराजिता अग्निहोत्री ( कन्नड उपविभाग ) यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक कुणाल सूर्यवंशी, पोलिस उपनिरीक्षक फरतडे, पोहेका बर्डे, पोलीस कॉन्स्टेबल अन्सार पटेल, गणेश कव्वाल, पवन खंबाट व इतर कर्मचाऱ्यांनी केली.

## आरक्षण उपवर्गीकरणाविरोधात महाधरणे आंदोलनास मोठ्या संख्येने उपस्थित राहा - अविनाश जावळे

➤ माजलगाव : प्रतिनिधी केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री तथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. रामदासजी आठवले साहेब यांच्या आदेशानुसार तसेच रिपब्लिकन युवक महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष मा. पप्पूजी कागदे साहेब यांच्या सूचनेनुसार रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया ( आठवले ) माजलगाव तालुक्याच्या वतीने दि. २७ जुलै सोमवार रोजी सकाळी ११ वाजता आरक्षण उपवर्गीकरणाच्या विरोधात माजलगाव तहसील कार्यालयावर धडक देत शासनाच्या निषेधार्थ निवेदन देण्यात येणार आहे.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया ( आठवले ) चे तालुकाध्यक्ष अविनाश जावळे यांच्या नेतृत्वाखाली होणाऱ्या या आंदोलनात पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच आंबेडकरी समाजबांधव मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.

आरक्षणातील उपवर्गीकरण हा अनुसूचित जातींच्या संविधानिक हक्कांवर आघात असल्याची भूमिका पक्षाने घेतली असून, हा निर्णय तात्काळ मागे घ्यावा, अन्यथा लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन




उभारण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

या आंदोलनाद्वारे शासनाकडे अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाचा निर्णय रद्द करणे, संविधानिक हक्कांचे संरक्षण करणे आणि विद्यमान आरक्षण व्यवस्थेत कोणताही विभाजनात्मक बदल न करणे, या प्रमुख मागण्या करण्यात येणार आहेत.

या आंदोलनात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच आंबेडकरी समाजातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन तालुकाध्यक्ष अविनाश जावळे यांनी केले.

ई पेपर वाचा
· सांज दैनिक बीड ·
वास्तव
http://epaper.beedvastav.com

## बीडचे प्रा. किशोर वाघमारे यांना राज्यस्तरीय "महाराष्ट्र लोकनायक आदर्श शिक्षक पुरस्कार" जाहीर



➤ बीड / प्रतिनिधी : बीड येथील देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्रा. किशोर शिवाजी वाघमारे सरांना या वर्षीचा मानाचा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झाला आहे. दैनिक लोक युवा वर्धापन दिन व लोकमान्य टिळक यांच्या जयंतीच्या निमित्ताने औचित्यसाधू शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याचा गौरव करण्यात येत आहे. शैक्षणिक योगदान : तुलसी संगणकशास्त्र महाविद्यालयात सलग १७ वर्षे अविरत ज्ञानदानाचे कार्य.

ग्रामीण भागात वाचन संस्कृती : पाटोदा बेल या जन्मगावी 'नालंदा सार्वजनिक वाचनालय' सुरू करून ग्रामीण भागात वाचनाची आवड रुजवली. डिजिटल साक्षरता : चऱ्हाटा, पाटोदा, बेलखंडी आणि पिंपळवाडी भागात कॉम्प्युटर इन्स्टिट्यूटच्या माध्यमातून शेकडो विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाशी जोडले. विद्यार्थी विकास : वक्तृत्व, निबंध व सामान्य ज्ञान स्पर्धांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षेची व शिक्षणाची गोडी निर्माण केली.

सामाजिक जाणीव : गरीब व वंचित मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सातत्याने धडपड. तुलसी शैक्षणिक समूहाचे संस्थापक अध्यक्ष प्राध्यापक प्रदीप रोडे सर यांच्या विचारांतून प्रेरित होऊन सरांनी हे मोलाचे योगदान दिले आहे. हा पुरस्कार सोहळा रविवार, दिनांक २ ऑक्टोबर रोजी स्थळ संत गजानन महाराज अभियांत्रिकी महाविद्यालय शेवगाव जि. बुलढाणा येथे संपन्न होणार आहे. प्रा. किशोर वाघमारे सरांचे मन:पूर्वक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा..

# आयडियल इंग्लिश स्कूल, पिंपरखेड येथे आषाढी एकादशीनिमित्त भव्य दिंडी सोहळा उत्साहात

➤ पिंपरखेड : प्रतिनिधी भारतीय संस्कृती, वारकरी परंपरा आणि संतांच्या विचारांचा वारसा विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावा या उदात्त हेतूने आयडियल इंग्लिश स्कूल, पिंपरखेड येथे आषाढी एकादशीनिमित्त भव्य दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या दिंडीत विद्यार्थ्यांनी विठ्ठल-रुक्मिणी, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, संत एकनाथ आदी संतांची आकर्षक वेशभूषा साकारत उपस्थितांची मने जिंकली.

टाळ-मृदंगाचा निनाद, हरिनामाचा अखंड गजर, अभंग, फुगड्या आणि वारकरी परंपरेचे दर्शन घडविणाऱ्या या दिंडीमुळे संपूर्ण पिंपरखेड गाव भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेले. गावातील नागरिक, पालक, वारकरी बांधव आणि विठ्ठलभक्तांनी दिंडीचे ठिकठिकाणी उत्स्फूर्त स्वागत करून विद्यार्थ्यांवर पुष्पवृष्टी करत या उपक्रमाचे मनापासून कौतुक केले.

या कार्यक्रमाचे नियोजन शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. रंजना शिंदे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सौ. लक्ष्मी गोंडे मॅडम, सौ. रेणुका तांगडे मॅडम, सौ. शितल कदम मॅडम, श्री. बळीराम करडकर सर, श्री. इंद्रजीत शिंदे ( वाहनचालक ), श्री. तांगडे ( वाहनचालक ) तसेच काळे ताई यांनी अत्यंत मेहनत घेऊन मोलाचे योगदान





दिले. याशिवाय संस्थेच्या प्रगतीसाठी सातत्याने भक्कम पाठबळ, प्रेरणा आणि मार्गदर्शन करणाऱ्या संस्थेच्या दोन आधारस्तंभ व्यक्तिमत्त्वांच्या सहकार्यामुळे हा सोहळा अधिक भव्य, दिव्य आणि यशस्वी ठरला. त्यांच्या प्रोत्साहनामुळे हा संस्कारमय उपक्रम अत्यंत आनंददायी वातावरणात पार पडला. या दिंडीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये भक्ती, शिस्त, संस्कार, सामाजिक ऐक्य, भारतीय संस्कृतीचा अभिमान आणि संतांच्या विचारांप्रती आदर निर्माण करण्याचा संदेश देण्यात आला. उपस्थित ग्रामस्थांनी आयडियल इंग्लिश स्कूलच्या या अभिनव आणि संस्कारक्षम उपक्रमाचे भरभरून कौतुक करत भविष्यातही अशा सांस्कृतिक व शैक्षणिक उपक्रमांचे सातत्याने आयोजन व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.